# बृहन्मुंबई महानगरपालिका

राजावाडी रुग्णालय घाटकोपर (पूर्व)

क्र एचओ /आरजीएच/९३५२/ आस्था ०२ दि.०७.०७.२०२३

## <u>सूचनापत्र</u>

बृहन्मुबई महानगरपालिका एन विभागातील राजावाडी रुग्णालय, घाटकोपर पूर्व येथे अतिरिक्त आयुक्त (प.उ.) यांच्या मंजुरी क्र. अति.आ./प.उप//डी/३३६३ दि.०९.०१.२०२३ नुसार 6 महिन्यांच्या कालावधी करिता (४५ दिवसानंतर एक दिवसाचा खंड देऊन) तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर 8 बहुउद्देशीय कामगार व 1 सफाईगार स्थानिक नोंदणीकृत एन जी.ओ. (मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था) असलेल्या अशासकीय संस्थांकडून सदरची सेवा घेण्यास मोहोरबंद पाकीटात अर्ज (इच्छापत्र) मागविण्यात येत आहे.

अर्जाचा नमुना इच्छुक संस्थांना राजावाडी मनपा रुग्णालय घाटकोपर (पूर्व) येथून रु.२२०/- अधिक वस्तु व सेवा कराचे चलन प्राप्त करुन रोख रक्कम किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. ``बृहन्मुंबई महानगरपालिका`` या नावाने मनपाच्या नागरी सुविधा केंद्रामध्ये (सीएफसी) जमा करुन ०७.०७.२०२३ ते १३.०७.२०२३ पर्यंत सकाळी ११:०० ते ०१:०० या वेळेत प्राप्त करावे (सार्वजनिक सुट्टी व साप्ताहिक सुट्टी वगळून). पात्र संस्थेच्या यादीतून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप वैद्यकीय अधिक्षक अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व इच्छापत्र इत्यादी साठी सदर रुग्णालयाच्या प्रशासकीय कार्यालयात सकाळी ११:०० ते ०४:०० या वेळेत संपर्क साधावा.

संस्थेने सदर रुग्णालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख १३.०७.२०२३ सायं ०३:०० वाजेपर्यत आहे.

सदर बाबतीत प्राप्त कागदपत्रे दि.१३.०७.२०२३ रोजी दु. ०४:०० वाजता उघडण्यात येतील.

सही/-

**वैद्यकीय अधिक्षक**

**राजावाडी रुग्णालय,घाटकोपर**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## राजावाडी रूग्णालय, घाटकपर (पू.)

## जाहिर सुचना

**विषयः** राजावाडी रुग्णालयात 8 बहुउद्देशीय कामगार व 1 सफाईगार कंत्राटी पद्धतीने भरण्याबाबत.

**संदर्भ:** क्र.अति.आ./प.उ./३३६३ दि.०९.०१.२०२३

सदर सुचनेद्वारे नोंदणीकृत अशासकीय संस्थांना (एनजीओ) कळविण्यात येते कि, राजावाडी मनपा सर्व साधारण रूग्णालयामध्ये एन.जी.ओ. मार्फत रूग्णांना नव्याने सेवा देण्यासाठी अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत इच्छुक अशासकिय संस्थांनी (एन.जी.ओ.) राजावाडी रुग्णालय, घाटकोपर- ४०० ०७७ यांचे नावे नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या संस्थांनी खालील नमूद आवश्यक कागदपत्रांसहित दि. १३.०७.२०२३ सायं ०३:०० वाजेपर्यंत सिलबंद अर्ज वैद्यकीय अधिक्षक राजावाडी रुग्णालय यांचे कार्यालय, येथे सिलबंद पेटीत टाकावे.
अशासकिय (एन.जी.ओ.) संस्थानी अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. सदर कामासाठी फक्त स्थानिक विभागातील अशासकिय संस्थांनी अर्ज करावेत.
२. प्रत्येक उमेदवाराकडून १००/- रुपयांच्या स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे तसेच कंत्राटदारांनी रु.५००/- च्या बॉड पेपरवर करारनामा सादर करण्यात यावा.
३. कार्यादेश बजावल्यापासून ६ महिन्याच्या कालावधीकरिता (४५ दिवसानंतर एक खंड देऊन) किंवा सदर कालावधीतील नियमित तत्वावर पदे भरेपर्यंत यापैकी जे आधी असेल ते त्या दिनांकापर्यंत कंत्राटी तत्वावर भरण्यास.
४. प्रती महिना प्रत्येक बहुउद्देशीय कामगार व सफाईगार यांना रु.20000/- प्रमाणे इतके निश्चित मानधन देण्यात येईल
५. वैद्यकीय अधिक्षक, राजावाडी रुग्णालय सुचनेनुसार रोजच्या कामाकरिता मागणी केल्याप्रमाणे (सकाळ/दुपार/रात्र) सुरळीतपणे विनाविलंब,सक्षम कामगारांचा पुरवठा करणे, सदर अटीचा भंग झाल्यास १०% प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
६. पुरवठा केलेल्या कामगारांचा देयकाची रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिका नियंमानुसार आवश्यक पडताळणी व लेखा परिरक्षणानंतर लेखा संकेतांक २२०४००८०० मधून ई.सी.एस./एन.ई.एफ.टी. द्वारे अधिदान केले जाईल.
७. संस्थेने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या कामगारांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत दरमहा वेतनाचे अधिदान आरटीजीएस/एनईएफटी द्वारे करणे बंधनकारक राहिल. तसे न केल्यास संस्थेचे काम रद्द करून संस्था काळया यादीत टाकण्यात येईल. महानगरपालिकेकडून आरटीजीएस/एनईएफटी द्वारे अधिदान मिळाले तरीही कामगारांना विहित अधिदान करणे बंधनकारक आहे. अन्यथा प्रपत्र व प्रमाणे दंड आकरणी करण्यात येईल.
८. बाल कामगारांचा पुरवठा करणे निषिध्द आहे व तसे केल्यास त्याची संपुर्णतः कायदेशीर जबाबदारी संबंधित अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांचीच राहिल.
९. अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांनी नोंदणी प्रमाणपत्र, बॅक खात्याचा तपशिल, मागील वर्षाचा ताळेबंद अहवाल व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

१०. उपरोक्त अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरित्या काम न करणा-या अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांचे कडून कामगार पुरवठा करण्याचे काम त्वरीत थांबविण्याचे अधिकार वैद्यकीय अधिक्षक, राजावाडी रुग्णालय यांना राहतील.

११. अशासकिय संस्था (एन.जी.ओ.) यांचे कडून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून लॉटरी पध्दतीने पात्र अशासकिय संस्थेची निवड करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

१२. अशासकीय संस्थेने पुरविण्यात येणारे उमेदवार कमीत कमी १० वी उत्तीर्ण व संगणक हाताळण्याचे ज्ञान असलेला असावा.

१३. कंत्राटी तत्वावरील कामगारांना कर्तव्यावर असताना होणा-या इजा व दुखापतीची संपुर्ण जबाबदारी आपल्या संस्थेची राहील. त्याबाबतीत हमीपत्र सादर करण्यात यावे.

१४. महानगरपालिका अधिनियम १८८८ कलम ७०(१) (b) नुसार लेखी करार सादर करण्यात यावा.

१५. विधी व लेखन साहित्य आकार व त्यावरील वस्तु व सेवाकराबाबत वेळोवेळी निर्गमित होणा-या परिपत्रकाअन्वये योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

१६. आपली संस्था काळ्या यादीत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात यावे.

लॉटरीची तारीख दि.१३.०७.२०२३ रोजी दु. ०४:०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/-

**वैद्यकीय अधिक्षक**

**राजावाडी रुग्णालय, घाटकोपर**